भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १९०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०३/२०१७

**१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १४/०३/२०१७ चे ०७.१५ वा. दरम्यान यातील फिर्यादी ही शाळेच्या गणवेशात सर्वागीन शिक्षण जुनीयर कॉलेज पिंडकेपार येथे शाळेत जात असतांना यातील आरोपीने तिचा पाठलाग करुन तिचे अंगावर रंग टाकला व फेकले असे शब्दात चिडवुन शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे वयाचे पुराव्याचे कागदावरुन व तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(ड),५०४ भादंवि. सहकलम १२ बाल लैंगिक अपराध कायदा सन २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास परीपोउपनी. फुकट पो.स्टे. साकोली हे करीत आहेत आरोपी अटक आहे.

**२) एटीएमधुन पैसे काढुन विश्वासघात केल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १३/०२/२०१७ ते १४./०३/२०१७ पावेतो यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे भारतीय स्टेट बॅक खाता भंडाराचे एटीएम कार्ड बदलवुन कार्डव्दारे लबाडीने विश्वासघात घेवुन एटीएम मधुन एकुण ६३,९००/–रु. काढल्याने फिर्यादी प्रकाश दत्तात्रय भुपाल वय ५८ वर्ष, रा. श्रध्दा पेठ मारोती अपार्टमेंन्ट खातरोड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४२०भांदवि. सहकलम ६६(क)माहिती तंत्रज्ञान अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. चव्हान पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलची चोरी . :-**

दिनांक १४/०३/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हे तहसिल कार्यलय भंडारा येथे होन्डा एक्टीवा मोटार सायकल क्र. एमएच ३६ एम ९२३८ किंमती २०,०००/–रु. ची कार्यालयासमोर खुल्या जागेत ठेवली असतांना कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुन चोरुन नेल्याने फिर्यादी प्रमोद श्रीराम गोंदुळे वय ३३ वर्ष, रा. आंबेडकर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. दांदळे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) अज्ञात वाहन चालकांचे हयगयीने मोटार सायकल चालकाला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :-**

दिनांक १४/०३/२०१७ ते २१.३२ वा. यातील जखमी राकेश रमेश मल्हेवार वय २७ वर्ष, रा. गणेशपुर हा आपल्या मोटार सायकल क्र. एमएच ३६ डब्लु ४८६८ ने बेला कडुन भंडारा कडे येत असतांनी यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपने व हयगयीने चालवुन जखमीचे मोटार सायकला धडक मारुन जखमीचे डोक्याला मार लागुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता अज्ञात वाहन चालक पळुन गेल्याने फिर्यादी सचीन देवचंद लेंडे वय ३५ वर्ष, रा. अशोक नगर फुलमोगरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९, ३३७ भांदवि. सहकलम १८४,१३४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी. तोडासे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) अवैध दारु/जुगार अडयांवर धाडी . :-**

दिनांक १४/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. गोबरवाही, पवनी, दिघोरी, भंडारा येथे अवैध दारू/जुगार अडयांवर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन १० लिटर हातभटटी दारु किंमती १२००/–रु. तसेच ३० लिटर २४० मिली लिटर देशी + १ मोटार सायकल किंमती १८,४००/–रु. व जुगारातुन किंमती ३१०/–रू. असा एकुण किंमती १९,९१०/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.